**L. A. BILL No. X OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

१९६१ चा महा. २४.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

(शा.म.मु.) एचबी ०४८१–१ (३६०–७-२०२१)

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २६ ची सुधारणा.

१९६१ चा. महा. २४.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २६ मधील, पोट-कलम (२) मध्ये, सहाव्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु तसेच, ३१ मार्च २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी घ्यावयाच्या संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत, संस्थेचे सर्व सदस्य, अन्यथा मतदान करण्यासाठी अपात्र नसतील तर, मतदान करण्यासाठी पात्र असतील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये, पोट-कलम (१अ) मधील, विद्यमान परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, या पोट-कलमाची तरतूद, ३१ मार्च २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी घ्यावयाच्या संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत, लागू असणार नाही.".

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**४.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप अडचण उद्‌भवेल त्याप्रमाणे, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे, राज्यात घोषित केलेली टाळेबंदी विचारात घेता, २४ मार्च, २०२० पासून सामाजिक व आर्थिक कार्ये थांबलेली आहेत. यामुळे राज्यातील सहकारी संस्थांच्या कामकाजावर देखील प्रतिकूल परिणाम झाला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम यांनुसार, संस्थांनी, विनिर्दिष्ट कालावधीत निवडणुका घेणे व वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे आवश्यक आहे. तथापि, कोविड-१९ वैश्विक साथ रोगाच्या प्रादुर्भावामुळे, संस्थांच्या निवडणुका व सर्वसाधारण सभा विनिर्दिष्ट कालावधीत घेता येऊ शकल्या नाहीत. म्हणून, उक्त अधिनियमात सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटते.

तसेच, कोविड-१९ साथ रोगामुळे, सहकारी संस्थांच्या सदस्यांना, मार्च, २०२१ पर्यंत दिलासा देण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम २७ मध्ये सुधारणा केली आहे. तथापि, ही सुधारणा करण्यापूर्वी, कोविड-१९ मुळे बाधित झालेले सदस्य, कलम २६ व २७ च्या तरतुदींनुसार, त्यांचे हक्क पुनःस्थापित करू शकलेले नाहीत. या संबंधात, मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली आणि मुंबई उच्च न्यायालयाने, गरज विचारात घेऊन, उक्त अधिनियमाच्या कलम २६ मध्ये यथोचित सुधारणा करण्याचा निदेश राज्य शासनास दिलेला आहे.

२. कोविड-१९ साथरोगाचा प्रादुर्भाव आणि परिणामी, त्यामुळे राज्यातील बाधित रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता, राज्य शासनाने, त्याच्या नियंत्रणाची एक उपाययोजना म्हणून, राज्यातील व्यक्तींच्या संचारावर कडक निर्बंध लादणे देखील आवश्यक झाले आहे आणि राज्य शासनाने, दिनांक ६ एप्रिल, २०२१ च्या आदेशाद्वारे, राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुकादेखील ३१ ऑगस्ट, २०२१ पर्यंत पुढे ढकललेल्या आहेत. अशा प्रकारे, उक्त अधिनियमाच्या कलम २६ च्या तरतुदींनुसार, विवक्षित सदस्यांचा, सक्रिय सदस्य न राहिल्यामुळे, मतदान करण्याचा हक्क हिरावला गेला आहे.

उक्त कलम २७ मध्ये सदस्यांच्या मतदान करण्याच्या हक्काची तरतूद आहे. त्याचे पोट-कलम (१अ) अशी तरतूद आहे की, जो सदस्य, सक्रिय सदस्य नाही तो सदस्य, मतदान करण्यासाठी हक्कदार असणार नाही. सक्रिय सदस्य असण्याच्या दृष्टीने, संस्थेच्या सदस्याने, संस्थेच्या उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, संस्थेच्या कामकाजात सहभागी व्हावे आणि संस्थेच्या किमान सेवांचा लाभ घ्यावा लागतो.

जो सदस्य, मागील पाच वार्षिक सर्वसाधारण सभांपैकी एका वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहिला असेल आणि ज्याने संस्थेच्या किमान सेवांचा लाभ घेतलेला असेल अशा सदस्याला, सहकारी संस्थेचा सक्रिय सदस्य म्हटले जाते.

असे निदर्शनास आले आहे की, कोविड-१९ साथरोग विचारात घेता, अनेक सहकारी संस्था, वित्तीय वर्ष समाप्त झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत, वार्षिक सर्वसाधारण सभा घेऊ शकलेल्या नाहीत आणि परिणामी, सदस्य, सक्रिय सदस्य म्हणून कायम राहू शकलेले नाहीत.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता, एखाद्या सदस्यास, सक्रिय सदस्य असणे आणि सन २०२१-२२ साठी सहकारी संस्थेच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी पात्र असणे शक्य व्हावे, म्हणून कलम २६ च्या पोट-कलम (२) व कलम २७ च्या पोट-कलम (१अ) यांमध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटते.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २९ जून, २०२१.

**बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.

## सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक १०-महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट

### (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यातील उतारे)

### (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.)

**१.** ते **२५.** ** ** ** **

**२६.** (१) ** ** ** ** सदस्यांचे हक्क व कर्तव्ये.

(२) संस्थेच्या प्रत्येक सदस्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(अ) लागोपाठ पाच वर्षांच्या कालावधीत सर्व सदस्य मंडळाच्या किमान एका बैठकीला उपस्थित राहणे :

परंतु, या खंडातील कोणतीही गोष्ट, ज्या सदस्याची अनुपस्थिती सर्वसदस्य मंडळाने क्षमापित केलेली असेल अशा कोणत्याही सदस्याच्या संबंधात लागू होणार नाही.

(ब) संस्थेच्या उपविधीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सेवांचा किमान मर्यादेत वापर करणे :

परंतु, जो सदस्य वरीलप्रमाणे लागोपाठ पाच वर्षांच्या कालावधीत अधिमंडळाच्या किमान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही आणि संस्थेच्या उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, लागोपाठच्या पाच वर्षांच्या कालावधीत किमान एकदा सेवांचा किमान मर्यादेत वापर करणार नाही, अशा कोणत्याही सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जेव्हा संस्था एखाद्या सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करील तेव्हा, ती संस्था, वित्तीय वर्ष समाप्त होण्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित सदस्याला अशा वर्गीकरणाबाबत विहित रीतीने कळवील :

परंतु असेही की, अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण केल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षांमध्ये, जो अक्रियाशील सदस्य अधिमंडळाच्या निदान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही आणि उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सेवांचा किमान मर्यादेत वापर करणार नाही असा कोणताही अक्रियाशील सदस्य कलम ३५ अन्वये काढून टाकले जाण्यास पात्र ठरेल :

परंतु असेही की, अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण केलेल्या सदस्याने, या पोट-कलमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे पात्रता निकषांची पूर्तता केल्यावर, तो क्रियाशील सदस्य म्हणून त्याचे पुनःवर्गीकरण केले जाण्यास हक्कदार होईल :

परंतु असेही की, एखादा सदस्य क्रियाशील किंवा अक्रियाशील सदस्य असण्याबाबत वाद उद्‌भवल्यास, असे वर्गीकरण केल्याचे कळविल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाकडे तयाबाबत अपील करण्यात येईल :

परंतु असेही की, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१३ याच्या प्रारंभाच्या लगतनंतर घेण्यात येणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत, त्या संस्थेचे सर्व विद्यमान सदस्य, त्यांना मतदान करण्यासाठी अन्यथा अपात्र घोषित केले नसेल तर, मतदान करण्यासाठी पात्र ठरतील.

**२७.** (१) ** ** ** ** सदस्यांचा मतदानाचा अधिकार.

(१अ) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, जो क्रियाशील सदस्य त्यानंतर संस्थेच्या कामकाजात सहभागी होण्यात आणि वेळोवेळी उपविधीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे किमान मर्यादेतपर्यंत सेवांचा वापर करण्यात कसूर करील तो सदस्य क्रियाशील सदस्य असण्याचे बंद होईल आणि तो मतदान करण्यास हक्कदार असणार नाही.

परंतु,—

(अ) ३१ मार्च, २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी घ्यावयाच्या संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत : आणि

(ब) जेव्हा निवडणुका घेण्यासाठी मतदार यादी, महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) अधिनियम, २०२० याच्या प्रारंभाच्या पूर्वी, अंतिम करण्यात आलेली असेल तेव्हा, या पोट-कलमाच्या तरतुदी लागू असणार नाही.

(२) ते (९) ** ** ** **

**२८.** ते **१६८.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०.]**

**[ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०**
**यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.**]**

**[ विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी**
**संमत केल्याप्रमाणे ]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.